**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ३६६४ /२०२३** **दिनांक :-१७/०५/२०२३**

## प्रेसनोट

मुंबई-बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावर वारंवार होणारे अपघातांवर नियंत्रण आणणेकरीता वाहतूक शाखा, प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे, प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांची चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीतर्फे कात्रज बोगदा ते नवले पूल या परिसरामध्ये पाहणी करुन अभ्यासपूर्ण अहवाल सादर करण्यात आला असून त्यामध्ये अपघात रोखण्याकरीता विविध उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

मुंबई-बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावरील नविन कात्रज बोगदा ते नवले पूल या परिसरामध्ये घडलेले प्राणांतिक व गंभीर अपघात हे प्रामुख्याने जड / अवजड वाहनांमुळे झाल्याचे दिसून येत आहे. जड वाहने / अवजड वाहतूक करणारी वाहने घाटातून वेगात येत असताना वाहनाचे ब्रेकिंग सिस्टीम योग्य प्रकारे प्रतिसाद न दिल्यामुळे व चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्यामुळे होत असल्याचे अद्यापपावेतोच्या अभ्यासावरुन दिसून आले आहे. त्यानुसार अद्यापपर्यंत समितीच्या झालेल्या बैठकांमध्ये वाहनांच्या वेगावर नियंत्रण आणणे हा मूळ गंभीर विषय चर्चिला गेला असून त्याकरीता या महामार्गावर कात्रज बोगदा ते नवले पूल या परिसरामध्ये जड / अवजड वाहतूक करणाऱ्या वाहनांकरीता ४० कि.मी. / तास वेगमर्यादा निश्चित करणे बाबत सर्वानुमते सुचविण्यात आले आहे.

सदर अपघात रोखण्याकरीता या परिसरातून वाहतूक करणाऱ्या जड, अवजड वाहनांचे वेगावर नियंत्रण आणणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, मुंबई- बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावरील कात्रज बोगदा ते नवले पूल या दरम्यान वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहनांकरीता (ट्रॅक्टर-ट्रेलर कॉम्बीनेशन, ट्रक-ट्रेलर, अर्टीक्युलेटेड व्हेइकल्स, मल्टी ॲक्सल वाहने, कंटेनर, मोठया आकाराची मालाची वाहतूक करणारे वाहने) खालीलप्रमाणे प्रायोगिक तत्वावर दि. १९/०५/२०२३ रोजी ००.०१ ते दि. २५/०५/२०२३ रोजी २४.०० वा. पर्यंत खालीलप्रमाणे वेगमर्यादेचे आदेश निर्गमित करीत आहे.

## आपत्कालीन आदेश

❖ **मुंबई- बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावरील कात्रज बोगदा ते नवले पूल या दरम्यान वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड (ट्रॅक्टर-ट्रेलर कॉम्बीनेशन, ट्रक-ट्रेलर, अर्टीक्युलेटेड व्हेइकल्स, मल्टी ॲक्सल वाहने, कंटेनर, मोठया आकाराची मालाची वाहतूक करणारे वाहने) वाहनांकरीता ४० कि.मी. / तास अशी वेगमर्यादा निश्चित करण्यात येत आहे.**

तरी नागरिकांनी याबाबत आपल्या काही सूचना असल्यास त्या पोलीस उप आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, बंगला नं. ६, जेलरोड, येरवडा, पुणे यांचे कार्यालयात दि. २६/०५/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. पर्यंत लेखी स्वरुपात कळवाव्यात. नागरिकांच्या सूचना व हरकती यांचा विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. रुग्णवाहिका, फायरब्रिगेड, पोलीस वाहने इ.) खेरीज करुन अंतिम आदेश काढण्यात येतील.

17-5-2023

**( विजयकुमार मगर )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर